दैनिक www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

महाराष्ट्र

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे

नविननिश्चल देवाजी येनोरकर (विदर्भ आवृत्ती कार्यकारी संपादक)

लक्ष्मण फकिरबा कांबळे (आवृत्ती संपादक), किरण काळे (आवृत्ती कार्यकारी संपादक)




छत्रपती संभाजीनगर ॥ वर्ष ६ वे ॥ अंक १४५ ॥ रविवार २४ मे २०२६ ॥ RNI No.MAHMAR/2014/54581 ॥ Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 ॥ पाने ४ किंमत २ रुपये ॥

## २ महिने वीजबिल न भरल्यास वीजपुरवठा होणार आपोआप खंडित

मुंबई : प्रतिनिधी

महावितरणने आता पूर्णपणे 'ॲक्शन मोड'वर येत ग्राहकांसाठी एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. राज्यात सध्या शहरांसह ग्रामीण भागातही 'स्मार्ट प्रीपेड आणि पोस्टपेड मीटर' बसवण्याची मोहीम वेगाने राबवली जात आहे. या नव्या डिजिटल प्रणालीमुळे आता ग्राहकांचा वीज वापर, बिलिंग आणि तक्रार निवारण पद्धतीत अमूलाग्र बदल होणार आहे.महावितरणकडून राज्यातील शहरांसह ग्रामीण भागातही 'स्मार्ट प्रीपेड आणि पोस्टपेड मीटर' बसवण्याची मोहीम वेगाने राबवली जात आहे. या आधुनिक तंत्रज्ञानामुळे वीज वापरावर ग्राहकांना अधिक नियंत्रण मिळत असून, महावितरणच्या 'महाविद्युत' ॲपद्वारे अचूक माहिती उपलब्ध होत आहे.बिल थकले की रिमोटने वीज कट

महावितरणने दिलेल्या माहितीनुसार, जर एखाद्या ग्राहकाचे सलग दोन महिने वीजबिल थकले असेल, तर स्मार्ट मीटर प्रणालीमुळे त्याचा वीजपुरवठा कोणत्याही कर्मचा-याशिवाय आपोआप (ऑटोमॅटिक) खंडित केला जाईल. प्रीपेड मीटर वापरणा-या ग्राहकांचे रिचार्ज संपताच रिमोटद्वारे वीजपुरवठा तात्काळ बंद होईल. ग्राहकाने ऑनलाईन पद्धतीने थकित बिल भरताच किंवा रिचार्ज करताच, कोणतीही दिरंगाई न होता वीजपुरवठा




पुन्हा तातडीने सुरू केला जाईल. ही सेवा २४ तास उपलब्ध असेल.

वीज गेल्यास फोन करण्याची गरज नाहीपूर्वी वीज गेल्यानंतर ग्राहकांना महावितरणच्या कॉल सेंटरवर फोन करून ताटकळत राहावे लागायचे. आता ही डोकेदुखी कायमची मिटणार आहे. एखाद्या भागातील वीज पुरवठा खंडित होताच, त्याची माहिती स्मार्ट मीटरद्वारे थेट महावितरणच्या नियंत्रण कक्षाला आपोआप मिळेल. यासाठी महावितरण विशेष सॉफ्टवेअर अपडेट करत आहे. यामुळे नेमका बिघाड कुठे झाला आहे, हे कर्मचा-यांना लगेच समजेल आणि दुरुस्तीचे काम वेगाने होईल.मीटर रीडिंगसाठी कर्मचारी घरी येणे बंद आतापर्यंत प्रत्येक महिन्याला मीटर रीडिंग घेण्यासाठी कंत्राटी कर्मचारी घरी येत असत. अनेकदा रीडिंग चुकीचे येणे किंवा वेळेवर न येणे अशा तक्रारी असायच्या. मात्र, आता सर्व रीडिंग रिमोटद्वारे डिजिटल पद्धतीने घेतले जाईल. ग्राहकांना त्यांचे वीजबिल थेट मोबाईलवर किंवा ई-मेलवर पाठवले जाईल. त्यामुळे कर्मचा-यांचे घरी येणे आता जवळपास पूर्णपणे बंद होणार आहे. ग्राहकांना होणार फायदा महावितरणच्या 'महाविद्युत' ॲपमुळे ग्राहकांना अनेक डिजिटल सुविधा मिळणार आहेत. रिअल-टाईम अपडेट : ग्राहक स्वत: किती वीज वापरत आहेत, यावर त्यांचे नियंत्रण राहील. पारदर्शक बिलिंग : बिलामध्ये होणा-या चुका टळतील आणि अचूक बिल मिळेल.ऑनलाईन पेमेंट : घरबसल्या एका क्लिकवर बिल भरण्याची सोय.

## १५ टक्के जागा वगळून अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया राबविणार : सीईटी सेल

मुंबई : नीट पेपरफुटीमुळे राज्यातील अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेला फटका बसण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. पण आता राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने (सीईटी सेल) ही शक्यता फेटाळून लावली आहे. भारतीय कोट्यातील १५ टक्के जागा वगळून ही प्रवेश प्रक्रिया पार पाडण्याची स्पष्टोक्ती दिल्यामुळे या सर्वांचा जीव भांड्यात पडला आहे. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी नुकतेच नीट पेपरफुटीमुळे अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया रखडणार असल्याचे विधान केले होते. हे अभ्यासक्रम वगळून प्रवेश प्रक्रिया राबवता येणार नाही का? असा प्रश्न यावेळी केला असता सीईटी कक्षाच्या आयुक्तांसह मंत्री पाटील यांनीही अशी प्रक्रिया राबवणे हे या ९ अभ्यासक्रमांसाठी इच्छुक असणा-या मुलांसाठी अन्यायकारक ठरेल, त्यांना इतर शाखांना प्रवेश घ्यायचे असतील तर ते घेता येणार नाहीत, असे नमूद केले होते. त्यामुळे राज्यभरातील विद्यार्थी व पालकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले होते. पण आता सीईटी सेलचे आयुक्त दिलीप सरदेसाई यांनी एका




प्रसिद्धीपत्रकाद्वारे नीटचे गुण ग्रा धरले जाणा-या अखिल भारतीय कोट्यातील १५ टक्के जागा वगळून ही प्रवेश प्रक्रिया पार पाडण्याची स्पष्टोक्ती दिल्यामुळे या सर्वांचा जीव भांड्यात पडला आहे.

सीईटी सेलच्या मते, नीट परीक्षेचे गुण कृषी अभियांत्रिकी, जैवतंत्रज्ञान, अन्न अभियांत्रिकी, लेदर तंत्रज्ञान, पॅकेजिंग तंत्रज्ञान, औषधनिर्माणशास्त्र, मुद्रण अभियांत्रिकी, फॅशन तंत्रज्ञान, टेक्स्टाईल रसायनशास्त्र या ९ अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी १५ टक्के अखिल भारतीय कोट्यातील जागांसाठी ग्रा धरण्यात येतात. पण हे अभ्यासक्रम राज्यातील केवळ १७ शासनमान्य संस्थांमध्येच आहेत. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने निर्धारित केलेल्या वेळापत्रकानुसार राज्यातील तांत्रिक व्यावसायिक अभियांत्रिकी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येते. त्यामुळे अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून जाहीर होणा-या वेळापत्रकानुसारच प्रवेश प्रक्रिया आयोजित केली जाईल

## राज्यातील द्रुतगती मोजणी १४ दिवसांत, नियमित २८ दिवसांत पूर्ण करा- जमाबंदी आयुक्त शैलेश नवाल यांचे निर्देश

छत्रपती संभाजीनगर, (जिमाका)- : राज्यातील द्रुतगती मोजणी प्रकरणे १४ दिवसांत तर नियमित मोजणी प्रकरणे २८ दिवसांत पूर्ण करून अर्जदारांना नकाशाची "क" प्रत देण्यात यावी, असे निर्देश जमाबंदी आयुक्त तथा संचालक भूमी अभिलेख शैलेश नवाल यांनी काल (दि. २२) येथे दिले. जमाबंदी आयुक्त तथा संचालक भूमी अभिलेख शैलेश नवाल यांनी २१ व २२ मे रोजी छत्रपती संभाजीनगर येथे भेटी देऊन भूमी अभिलेख विभागाच्या विविध कामांचा आढावा घेतला.गुरुवारी (दि.२१)रोजी त्यांनी उपसंचालक भूमी अभिलेख, छत्रपती संभाजीनगर प्रदेश कार्यालयास भेट देऊन विभागातील सर्व जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, उप अधीक्षक भूमी अभिलेख व नगर भूमापन अधिकारी यांची ऑनलाईन बैठक घेतली. यावेळी प्रलंबित प्रकरणे विहित मुदतीत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. विशेषतः ज्या तालुक्यांमध्ये द्रुतगती मोजणी १४ दिवसांत आणि नियमित मोजणी २८ दिवसांत पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, त्या तालुक्यांचा प्रकरणनिहाय आढावा घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना त्यांनी केल्या.तसेच प्रशिक्षण प्रबोधिनीला भेट देऊन आवश्यक सुधारणा, निधी प्रस्ताव सादर करणे तसेच प्रशिक्षणार्थी कर्मचाऱ्यांची क्षमता बांधणी याबाबत मार्गदर्शन केले. **नक्शा पथदर्शी प्रकल्पाचा आढावा** नक्शा पथदर्शी प्रकल्पांतर्गत कन्नड नगर परिषद हद्दीतील गावठाण क्षेत्राचा अंतिम नकाशा व सनद श्री. नवाल यांना सादर करण्यात आली. **अधिकारी-कर्मचाऱ्यांशी संवाद** उप अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयास भेट देऊन श्री. नवाल यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधला, त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि कार्यालय स्वच्छ व सुस्थितीत ठेवण्याच्या सूचना दिल्या.

राज्यातील प्रत्येक तालुक्यात पुढे "e-Mahabhumi" केंद्र स्थापन करून नागरिकांना ऑनलाईन सेवा उपलब्ध करून देण्याचे निर्देशही त्यांनी दिले. **नगर भूमापन कार्यालयाला भेट** मौजे मुकुंदवाडी, ता. छत्रपती संभाजीनगर येथील रेल्वे दुहेरीकरण भूसंपादन मोजणी कामाची पाहणी करून आवश्यक मार्गदर्शक सूचना दिल्या. **१ जूनपासून राज्यभर नवीन कार्यपद्धती** भूमी अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनीच्या सभागृहातून राज्यातील सर्व उपसंचालक व जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांची ऑनलाईन बैठक घेण्यात आली. या बैठकीत १ जून २०२६ पासून राज्यातील निवडलेल्या सर्व कार्यालयांत द्रुतगती मोजणी १४ दिवसांत आणि नियमित मोजणी २८ दिवसांत पूर्ण करून नकाशा "क" प्रत देण्याची कार्यवाही सुरू करण्याचे आदेश देण्यात आले. **प्रत्येक मिळकतीस स्वतंत्र प्रॉपर्टी कार्ड** प्रत्येक नागरिकाला स्वतंत्र प्रॉपर्टी कार्ड व नकाशा उपलब्ध व्हावा यासाठी विविध कार्यालयांत सुरू असलेली मिळकतींची एकत्रित गठ्ठा कार्ड पद्धत रद्द करून प्रत्येक मिळकतीचे स्वतंत्र प्रॉपर्टी कार्ड व नकाशा तयार करण्यासाठी मानक कार्यप्रणाली तयार करून तत्काळ अंमलबजावणी सुरू करण्याचे निर्देश श्री. नवाल यांनी दिले.

## "निरामय छत्रपती संभाजीनगर" अभियानाला गती आरोग्य सेवा तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी व्यापक नियोजन

छत्रपती संभाजीनगर, दि. २३(जिमाका)- मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाच्या माध्यमातून "निरामय छत्रपती संभाजीनगर" अभियानाला गती देण्यासाठी मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे राज्यस्तरीय वैद्यकीय समन्वयक डॉ.स्वानंद सोनार यांनी शुक्रवारी (दि. २२) छत्रपती संभाजीनगर येथे प्रशासकीय अधिकारी, विविध कंपन्यांचे प्रतिनिधी, संघटना प्रमुखांसोबत भेटी दिल्या तसेच प्रत्यक्ष रुग्णांनाही भेटी देऊन पाहणी केली.

डॉ. सोनार यांनी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, अप्पर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकूणे तसेच निवासी उप जिल्हाधिकारी जनार्दन विधाते यांच्यासमवेत "निरामय छत्रपती संभाजीनगर" या महत्त्वाकांक्षी प्रकल्पावर चर्चा केली. तसेच जिल्हा मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाने मागील चौदा महिन्यांत राबविलेल्या विविध आरोग्य उपक्रमांचाही आढावा घेण्यात आला. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. बालाजी गोरे, समाजसेवा अधीक्षक शामसुंदर वाकळे आणि वैद्यकीय समन्वयक गजानन कांबळे उपस्थित होते. डॉ. स्वानंद सोनार यांनी सांगितले की, जिल्ह्यातील सेवाभावी संस्था, रुग्णालये आणि औद्योगिक कंपन्यांनी एकत्रितपणे काम केल्यास आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे तळागाळापर्यंत पोहोचविता येऊ शकते.

**स्थानिक आरोग्य समस्यांवर विशेष भर**

जिल्ह्यात वाढत असलेले स्तनाचा कर्करोग, गर्भाशयाच्या तोंडाचा कर्करोग, सिकलसेल, ॲनिमिया आदी आजारांच्या पार्श्वभूमीवर झोपडपट्ट्या, आदिवासी पाडे, तांडे, असंघटित कामगार आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी



विशेष आरोग्य प्रकल्प राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. कर्करोगाचे प्रारंभिक टप्प्यात निदान व्हावे यासाठी शेवटच्या घटकापर्यंत जाऊन स्क्रीनिंग मोहीम राबविण्याची आवश्यकता असल्याचे डॉ. सोनार यांनी सांगितले.

**रुग्णालयांना भेटी**

डॉ. स्वानंद सोनार यांनी छत्रपती संभाजीनगर येथील कर्नावट हॉस्पिटल तसेच श्री भगवान महावीर हॉस्पिटल या रुग्णालयांना अचानक भेटी देऊन उपचारासाठी दाखल रुग्णांची प्रत्यक्ष भेट घेत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

**सीएसआरच्या माध्यमातून आरोग्य सेवांना बळ**

विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्यासोबत झालेल्या बैठकीत सीएसआर निधी आणि मराठवाड्यातील उद्योजकांच्या सहकार्याने आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासंदर्भात प्राथमिक चर्चा करण्यात आली. तसेच अप्पर जिल्हाधिकारी संभाजी अडकुणे आणि निवासी उपजिल्हाधिकारी जनार्धन विधाते यांच्यासोबत जिल्ह्यातील सेवाभावी संस्था, उद्योजक आणि दात्यांच्या सहकार्याने "निरामय छत्रपती संभाजीनगर" अभियान अधिक प्रभावी करण्याबाबत चर्चा झाली. **गैरप्रकार करणाऱ्यांवर कारवाईचा इशारा**

शासकीय निधीचा अपहार करणारी, खोटी प्रकरणे सादर करणारी रुग्णालये आणि मध्यस्थांविरोधात जिल्हा कक्षाच्या सहाय्याने भरारी पथकाद्वारे आकस्मिक तपासणी व पडताळणी करून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही डॉ. स्वानंद सोनार यांनी दिला

## श्री स्वामी समर्थ महाराज हे कलियुगातील महीपती - न्यायमूर्ती अरुण पेडणेकर

अक्कलकोट - आपल्या अपार लिलांनी द्वापार युगात जसे महीपती भगवान श्रीकृष्णांनी आपली महीमा पृथ्वीतालावर अधोरेखीत केली आहे तशीच महीमा वर्तमान कलियुगात श्री स्वामी समर्थांची प्रचलीत झाली व होत आहे, म्हणून ब्रम्हांडनायक श्री स्वामी समर्थ महाराज हे कलियुगातील महीपती असल्याचे मनोगत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती अरुण पेडणेकर यांनी व्यक्त केले. ते नुकतेच येथील श्री.वटवक्ष स्वामी महाराज मंदीर येथे भेट देवून श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदीर समिताच्या वतीने समितीचे चेअरमन तथा भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथमेश इंगळे यांनी

न्यायमूर्ती अरुण पेडणेकर व कुटूंबियांचा

श्री.स्वामी समर्थाचे कृपावस्र, प्रसाद, प्रतिमा देवून यथोचित सत्कार केला. यावेळी न्यायमूर्ती अरुण पेडणेकर

बोलत होते. पुढे बोलताना न्यायमूर्ती अरुण पेडणेकर यांनी श्री.स्वामी समर्थांनी आपल्या अवतार कार्यात अनेक चमत्कार केले आहेत. दीन दुबळ्यांचे असाध्य आजार बरे केले आहेत. श्री. स्वामी समर्थांना आपला भक्त मोह माया पासून परावृत्त राहून त्याग व समर्पण करणारा भक्त प्रिय आहे. अशा अनेक भाविकांना स्वामींची प्रचिती आली व येत आहे, त्यामुळे श्री स्वामी समर्थांच्या भक्त गणांची संख्या वाढत आहे. सर्व स्वामी भक्तांना उत्तम सोई सुविधा देता याव्यात सर्वांना सुलभपणे स्वामी दर्शनाचा लाभ घेता यावा याकरीता मंदीर समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे व मंदीर समिती पदाधिकारी यांनी समर्पण भावनेने श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान मध्ये सेवा देत असल्याचे पाहून आपण प्रभावित झालो असल्याचे मनोगतही व्यक्त करून आपला येथे विशेष आदरतिथ्य करण्यात आल्याबद्दल

न्यायमूर्ती अरुण पेडणेकर यांनी चेअरमन महेश इंगळे व मंदीर समितीचे आभार मानले.

संपादकीय

## वेदनेचा हुंकार

लहान-मोठ्या मुली ते विधवा, परित्यक्ता, वयोवृद्ध महिलांवर वैमनस्यातून होणारे अन्याय, अत्याचार, घरंदाज विवाहितांचे संशयास्पद मृत्यू, आत्महत्या प्रकरण म्हणजे समस्त स्त्री वर्गाची शारीरिक, मानसिक चाळण करण्याचे दरमहा वाढीस लागलेले प्रकार. या छिन्नविछिन्न करणाऱ्या मरणासन्न अवस्थेतून जाणं यासारखी क्लेशकारक घटना नाही. आजची उद्विग्न परिस्थिती ही याचं उत्तम द्योतक आहे. ढासळलेली व्यवस्था, बंदिस्त चौकट, राजकारणातले कैक डावपेच, न्यायप्रतीक्षेच्या विलंबित सहयोगामुळे विदारक स्थिती निर्माण झाली आहे, जी स्त्री-पुरुष समानता निवाड्याच्या संदर्भात उलटी खेळी खेळते. आचार-विचारांच्या सदाचारी मूल्यांना पायदळी तुडवण्याचे प्रकार वारंवार घडतात. जेव्हा यंत्रणा चौकटी बाहेरचा न्याय देऊ शकत नाही, तेव्हा समाजाभिमुख मानसिक संतुलनाचा विषय मुख्य ठरतो. आजच्या घडीला मानसिक स्वास्थ्याकडे गांभीर्याने पाहण्याची, तिची मशागत करण्याची गरज आहे.

एकविसाव्या शतकात आपण स्त्री-पुरुष समानतेचे गोडवे गातो. ते गाताना आपण थकत नाही. स्त्री म्हणजे माता, भगिनी ते देवस्वरूप भवानी आई. नारायणी रूपात आपण तिची पूजा बांधतो. कवन रचतो, गुणगान गातो. पण एका मोहाच्या क्षणी अमानवी अजगरी पाशात तिला अडकवलं जातं. वाममार्गे गुंगीच्या औषधांचा उतारा दिला जातो. राक्षसी वृत्तीचे व्रण शरीरभर उमटताना गुप्तांगावर वार करत अश्लील व्हिडीओ समाजमाध्यमात पसरवण्याची धमकी दिली जाते. शेवटी बलात्कार करून, खून करून तिची विल्हेवाट लावली जाते. ओळख मिटवली जाते. हा बदल एका दिवसातला नसतो, तर पुलाखालून बरंच पाणी वाहून गेलेलं असतं तेव्हा तो जाणवू लागतो. शरमेने मान खाली घालायला लावणाऱ्या विटंबना भयंकर कृत्याच्या मालिका षंढ समाजात रुजत आहेत. समाजात जेव्हा काही वेगळं घडतं तेव्हा त्याची सुरुवात चार भिंतीतल्या कुटुंबाच्या आत होत असते. लैंगिक शोषण असो वा अनैतिकता, व्यभिचार वा विवाहबाह्य संबंध असो नराधमाला पाठीशी घालणारी घरची देखील यात सामील असू शकतात. यास्तव बाईकडे पाहण्याचा दृष्टिकोनहीन आणि समस्त स्त्रीवर्गाला अधाशी वासनांध नजरेतून पाहण्याची जणू मुभा प्राप्त झाली असावी असा झाला आहे. संशय निर्माण करणाऱ्या नात्यातली तेढ वाढत जाऊन अनैतिक संबंध, पुनर्विवाह, पती-पत्नी, प्रियकर-प्रेयसी त्रिकोण, कुणाचा पायपोस कुणाला नसल्याने कुणीही यावे टपली मारून जावे, बघू नये, बोलू नये, गुपचूप बसावे अशा प्रकारच्या कर्मकांडाला आपणचं खतपाणी घालत आहोत.

नसरापूर घटनेतील छोट्या चिमुकलीवर शब्दांत भावना व्यक्त करणं कठीण आहे. जो अत्याचार झाला त्याची जखम खोलवर आहे. आतून काही तुटल्यासारखं होताना वेदनेचा आवाज गपगार झाला आहे. आज पाशवी अत्याचार करणारे विकृत नराधम आणि उर्वरित व्यवस्था बाईचा आवाज दडपून टाकतील, पण उद्या हाच आवाज प्रतिरोधाच्या आगीत तुम्हाला भस्म करेल. आजची स्त्री सुरक्षित आहे का? हा प्रश्न अनुत्तरीतच आहे. सर्वांच्या नजरा त्याकडे लागून राहिल्या आहेत. माणूस माणसापासून दूर जात आहे. सहनशक्तीचा कडेलोट होतोय. प्रश्नमंजूषा पेटून उठली आहे. या सगळ्याला जबाबदार कोण? मानसिक विकृती की भाग्यशाली संस्कृती याची जाणीवपूर्वक विचार करून उत्तरं देण्याची वेळ आली आहे. फाशी देऊन, बंदुकीच्या गोळ्या घालून, रस्त्यात जमावाकडे सुपूर्द करून, कडेलोट, जन्मठेप देऊन नराधम माणूस मरेल, पण शिक्षा इतकी भयंकर हवी की ही नालायक 'वृत्तीचं' मरायला हवी. माजलेल्या भेकड वाकडतोंड्या नराधमाला आलेली हिम्मत मारायला हवी. याला फाशी देणं म्हणजे याची क्षणात सुटका करणे, असे न करता याच्याच मार्गांवर असणाऱ्यांना हादरवून सोडणारा भयंकर मृत्यू याला द्यायला हवा. अखेर मृत्यू म्हणजे सुटका वाटायला हवी.

मर्यादा ओलांडणाऱ्या महिन्याभरातल्या घटना पाहता हे जग आपल्यासाठी नाही याची खात्री पटत चालली आहे. मानवी मनातली गुंतागुंत पाहता माणसं विरुद्ध वाढत चाललेल्या विकार विकृतीची नशा जोर धरू लागली आहे. अशा क्रूर निर्दयी मानसिकतेला बदलणं अशक्यप्राय गोष्ट आहे. कारण जगात माणूसपण संपत चाललंय तसा चांगुलपणा पानावरील मिठासारखा केवळ नावालाचं उरलाय. पुढच्या काळात बाईच्या जातीला काय काय वाढून ठेवलं असेल सांगता यायचं नाही.

# अमरधाम स्मशान भुमीमध्ये आता बसणार २000लिटर पाण्याची टाकी

पनवेल प्रतिनिधी
सुनील जाधव

नवी मुंबई,पनवेल शहरामधील अमरधाम स्मशान भुमीत अंत्यविधीसाठी पाणी उपलब्ध नसल्याने मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना चक्क बिसलेरी पाण्याच्या बाटल्या विकत आणुन अंतिम विधी करावा लागल्याची धक्कादायक घटना घडली आहे.पनवेल महानगर पालिकेच्या या ढिसाळ कारभारामुळे मृतकांच्या नातेवाईंकासह,स्थानिक नागरिकामधुंन तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.मिळालेल्या माहीती प्रमाणे अमरधाम स्मशानभुमीत एकाच वेळी दोन मृतदेह अंत्यसंस्कारासाठी आले होते.मात्र तिथेच पाणीच नव्हते.नातेवाईकांनी तातडीने पालिकेच्या पाणी पुरवठा



विभागाशी आणि टँकर साठी संपर्क साधला पण वेळेत टँकर ही उपलब्ध होवु शकला नाही.अखेर नाईलाजास्तव नातेवाईकांनी बाहेरुन बिसलेरीच्या पाण्याच्या बाटल्या आणुन विधी पुर्ण केला.या घटने नंतर नागरिकांनी पालिकेच्या या अनागोंदी कारभारावर जोरदार टिका केली.यावर पालिकेने आपली बाजु मांडताना ठेकेदाराच्या कर्मचा-याने आधी पाच मृतदेहाच्या अंत्यविधी साठी पाणी उपलब्ध करुन दिल्यामुळे ५०० लिटर संपले असे कारण पुढे केले होते.मात्र कर्मचा-याने दिलेले हे कारण साफ चुकीचे सांगत पालिकेने ते फेटाळुन लावले आहे.स्मशानभुमी सारख्या संवेदनशील ठिकाणी पाण्याच्या अपु-या व्यवस्थेबाबत ठेकेदाराने आणि त्याच्या कर्मचा-याने आधीच जाग्रुत राहायला हवे होते.याबाबत पालिकेने ठेकेदाराला कडक सुचना दिलेल्या आहेत.दरम्यान पनवेल महानगर पालिका प्रशासनाने या घटनेची गांभीर्याने दख्खल घेतली असुन तेथील ५०० लिटरची टाकी हटवुन त्या जागी २००० हजार लिटर क्षमतेची नवीन टाकी बसविण्याचा तातडीने निर्णय घेतला आहे.भविष्यामध्ये या टाकीमध्ये पुरेसे पाणी जमा राहील आणि नागरिकांची गैरसोय होणार नाही असा विश्वास पालिका प्रशासनाने दै,सुर्यादयच्या प्रतिनिधींशी बोलताना व्यक्त केला.

# कोकण कृषी परिसंवादआणि मार्गदर्शन - घरडा फौंन्डेशनचा उपक्रम

घरडा कृषी संसाधन केंद्र, कृषी विभाग, खेड, चिपळूण आणि पंचायत समिती खेड यांच्या संयुक्त विद्यमाने दि २१/५/२०२६ रोजी शेतकरी मेळावा आणि परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. खेड, चिपळूण तालुक्यांमधून सुमारे २०० हून अधिक शेतकरी बांधवानी ह्या मेळाव्याला उपस्थिती दर्शवली. सदरचा शेतकरी मेळावा २ सत्रात घेण्यात आला होता. सकाळच्या सत्राची सुरुवात घरडा कृषी संसाधन केंद्रात शेतकऱ्यांची भात बियाण्यासाठी नाव नोंदणी करून विविध प्रकारच्या भाजीपाला बियाण्यांचे आणि गांडूळखताचे वाटप करून करण्यात आली.ह्नपहिल्या सत्रात कृषी विभाग खेड, चिपळूण यांनी घरडा कृषी संसाधन केंद्रामध्ये भात बीज उगवण प्रात्यक्षिक करून दाखवले, बीज प्रक्रिया कशी करतात आणि त्याचे फायदे याविषयी मार्गदर्शन करून शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. जीवाणूजन्य खते वापरून शेती कशी फायद्यात करता




येते आणि रासायनिक खतांचा वापर कमी करून सेंद्रिय शेती कशी करावी या विषयी सखोल माहिती कृषी विभागाकडून शेतकरी मित्रांना देण्यात आली. त्यानंतर घरडा कृषी संसाधन केंद्रात शेतकऱ्यांसाठी उभारण्यात आलेल्या विविध कृषी मॉडेल्स ना शेतकऱ्यांनी भेट देऊन त्याची माहिती घेतली. ह्नपंचायत समिती सभापती ह्यांनी सकाळच्या सत्रात उपस्थित राहून घरडा संसाधन केंद्राची पाहणी केली तसेच घरडा फौंडेशनने उभे केलेल्या कृषी मॉडेल्सची प्रशंसा केली आणि कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या. ह्नदुसरे सत्र घरडा हॉस्पिटल मध्ये घेण्यात आले, दुसऱ्यासत्रात मा. माळी साहेब, तालुका कृषी अधिकारी, खेड यांनी विविध कृषी विषयक शासकीय योजनांची माहिती तसेच कृषी विषयक मोबाईल ची माहिती देऊन त्याचे फायदे कसे आहेत हे सांगितले, तसेच शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे निरसन करण्यात आले. त्याचबरोबर मा. गावडे साहेब यांनी पंचायत समिती खेड यांच्या मार्फत राबवण्यात येणाऱ्या कृषी विषयक शासकीय योजनांची माहिती दिली, तसेच कुणाल शिंदे यांनी ह्या सरकारी योजनेचे फायदे आणि त्याची नोंदणी ह्या विषयी माहिती दिली, ह्नकार्यक्रमाला ३ प्रगतशील शेतकरी यांनी मार्गदर्शन केले, गांडूळखत मधील यशस्वी शेतकरी सौ स्वाती साळवी, कापसाळ कुक्कुट पालन मधील यशस्वी शेतकरी सौ पालांडे, धामनंद आणि दुग्ध व्यवसाय मध्ये ज्यांनी स्वतः:चा ब्रण्ड उभा केला असे श्री समाधान मुळ्ये, सावर्डा यांनी शेतकऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन करून त्यांना प्रोत्साहित केले. ह्नशेतकरी परिसंवादाचे प्रास्ताविक मा. विनायक दळवी, घरडा प्रमुख यांनी केले, त्यांनी घरडा कृषी संसाधन केंद्राबद्दल माहिती दिली आणि शेतकरी यांना शेतमालासाठी थेट बाजारपेठ कशी मिळवता येईल त्याबद्दल मार्गदर्शन केले, तसेच घरडा कृषी संसाधन केंद्रामार्फत राबवल्या जाणाऱ्या विविध कार्यक्रमांची माहिती देऊन शेतकऱ्यांना कार्यक्रमामध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले.ह्नघरडा केमिकल्स चे कार्यकारी संचालक श्री निलेश कुलकर्णी आणि घरडा केमिकल्स लोटेचे प्रमुख श्री रामकृष्ण कुलकर्णी यांनी कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या. ह्नशेतकरी मेळावा यशस्वी करण्यासाठी घरडा केमिकल्स लोटे यांची मदत लाभली तसेच या मेळाव्यासाठी घरडा केमिकल्स च्या ह्नगौरी विचारे, आकांक्षा हिरे, यांनी शेतकऱ्यांचे मनोगत घेतले.

# मानसून पूर्व तयारीनुसार नेरळ ग्रा.पं ला नालेसफाईचा पडला विसर !

रायगड जिल्हा उ. संपादक/ मंगेश यादव :पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असतानाही नेरळ ग्रामपंचायतीकडून अद्याप नालेसफाईची कामे पूर्णपणे करण्यात आलेली नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. दरवर्षी मुसळधार पावसामुळे नेरळ शहरातील अनेक भागांमध्ये पाणी साचण्याच्या घटना घडतात. मात्र यावर्षीदेखील प्रशासनाने वेळेत उपाययोजना न केल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.ह्नेरळ बाजारपेठ, पायरमाळ, चिंचआळी, मोहाचीवाडी, खांडा परिसर, स्टेशन रोड, गंगानगर, मातोश्रीनगर तसेच अंतर्गत वाड्या-वस्त्यांमधील अनेक नाले गाळ आणि कचऱ्याने तुंबलेले दिसून येत आहेत. काही ठिकाणी झुडपे वाढल्याने पाण्याचा निचरा होण्यास अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे







जोरदार पाऊस झाल्यास नागरिकांच्या घरांमध्ये पाणी शिरण्याची भीती व्यक्त केली जात आहे.ह्नस्थानिक नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे की, दरवर्षी नेरळ ग्रामपंचायतीकडून मानसूनपूर्व नालेसफाईचे नियोजन जाहीर केले जाते. मात्र प्रत्यक्षात अनेक भागांमध्ये नालेसफाई ही अर्धवट राहते. यामुळे डासांची उत्पत्ती वाढून आरोग्याचा प्रश्नदेखील निर्माण होत आहे. तर तोंडावर पावसाळा आला असताना, मात्र सध्या नेरळ ग्रामपंचायत हद्दीतील परिसरातील नालेसफाई ही झाली नसल्याचे वास्तव हे समोर येत असल्याने, मानसूनपूर्व तयारीचा नेरळ ग्रामपंचायतीला विसर पडला का? असा प्रश्न हा नेरळच्या सामान्य करदात्यांकडून उपस्थित केला जात आहे. ह्नतर नागरिकांकडून नेरळ ग्रामपंचायतीने तातडीने सर्व भागांतील नालेसफाई पूर्ण करून संभाव्य पूरस्थिती व नागरिकांच्या आरोग्याविषयक निर्माण होणारा प्रश्न टाळण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली जात आहे. तसेच पावसाळ्यापूर्वी रस्त्यांवरील खड्डे बुजवणे, गटारे साफ करणे आणि आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

प्रतिक्रिया........

नेरळ मधील नालेसफाईची वर्क ऑर्डर ही झाली असुन, सोमवार पासून नेरळ मधील नालेसफाईला सुरवात ही नेरळ ग्रामपंचायतीच्या माध्यमातून करण्यात येईल.

:- सुजित धनगर, प्रशासकीय अधिकारी, नेरळ ग्रा.पं.

# जागतिक परिषद तिसऱ्यांदा अयशस्वी ; अमेरिका-इराण वाद विकोपाला

न्यूयॉर्क : वृत्तसंस्था

जागतिक सुरक्षा आणि अण्वस्त्रांच्या शर्यतीला लगाम घालण्याच्या उद्देशाने न्यूयॉर्कमध्ये आयोजित करण्यात आलेली संयुक्त राष्ट्रांची अत्यंत महत्त्वाची बैठक पुन्हा एकदा निष्फळ ठरली आहे. अण्वस्त्र प्रसारबंदी कराराच्या आढावा बैठकीची तिसरी फेरी कोणत्याही अंतिम कराराशिवाय संपुष्टात आली असून, यामुळे जागतिक राजकारणात प्रचंड तणाव निर्माण झाला आहे. या अपयशानंतर इराणने आक्रमक पवित्रा घेत अमेरिका आणि तिच्या पाश्चात्त्य मित्र राष्ट्रांवर या जागतिक



परिषदेत मुद्दाम 'अडथळा आणल्याचा' गंभीर आरोप केला आहे. अमेरिकेच्या वाढत्या दबावामुळे आणि अवास्तव मागण्यांमुळेच हा जागतिक शांततेचा प्रयत्न सलग तिस-यांदा अपयशी ठरल्याचे इराणने उघडपणे म्हटले आहे.

संयुक्त राष्ट्रांमधील इराणच्या स्थायी मिशनने 'एक्स' (पूर्वीचे ट्विटर) या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक अत्यंत कडक शब्दांतील अधिकृत निवेदन जारी केले आहे. या निवेदनात इराणने म्हटले आहे की, ''अमेरिकेच्या हुकूमशाही आणि अवाजवी मागण्यांमुळे आज एनपीटी करार अत्यंत नाजूक आणि अधोगतीच्या स्थितीत पोहोचला आहे.'' इराणने जागतिक समुदायाला चेतावणी दिली आहे की, जर जगातील बड्या महासत्तांनी अण्वस्त्र नि:शस्त्रीकरणाबाबत प्रामाणिक पावले उचलली नाहीत, तर भविष्यात या कराराचे अस्तित्वच धोक्यात येईल. या विधानामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर पुन्हा एकदा शीतयुद्धासारखी परिस्थिती निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

४ वेळा मसुदा बदलला

२७ एप्रिल रोजी न्यूयॉर्कमधील संयुक्त राष्ट्रांच्या भव्य मुख्यालयात या ऐतिहासिक आढावा बैठकीची सुरुवात झाली होती. अनेक दिवस चाललेल्या या परिषदेचा शुक्रवारी शेवटचा दिवस होता. जपानचे प्रसिद्ध सार्वजनिक प्रसारक 'एनएचके'च्या अहवालानुसार, सदस्य देशांमध्ये एकमत घडवून आणण्यासाठी अंतिम दस्तावेजाचा मसुदा एक-दोनदा नव्हे, तर तब्बल चार वेळा बदलण्यात आला. परंतु, प्रत्येक वेळी काही वादग्रस्त मुद्द्यांवरून अमेरिका आणि इराण एकमेकांसमोर उभे राहिले. शेवटच्या मिनिटापर्यंत पडद्यामागे अनेक गुप्त वाटाघाटी झाल्या, परंतु दोन्ही देश आपापल्या भूमिकेवरून मागे हटण्यास तयार नव्हते.

# प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर करण्यात येणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई : महाराष्ट्रातील येरवडा, ठाणे, रत्नागिरी आणि नागपूर येथील प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर करणे हा केवळ आरोग्य व्यवस्थेचा विस्तार नसून, गुणवत्तापूर्ण उपचार, संशोधन आणि प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मितीच्या दिशेने टाकलेला दूरदर्शी आणि मानवकेंद्री पाऊल आहे. यामुळे समाजातील वंचित घटकांपर्यंत अधिक सक्षम, सुलभ आणि आधुनिक मानसिक आरोग्य सेवा पोहोचविण्याचा आमचा संकल्प अधिक बळकट होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र राज्यातील येरवडा (पुणे), ठाणे, रत्नागिरी आणि नागपूर येथील चार प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालये समाजातील विशेषतः वंचित घटकांना मोठ्या प्रमाणावर आरोग्य सेवा पुरवत आहेत. बाह्यरुग्ण व आंतररुग्ण सेवांद्वारे ही रुग्णालये हजारो रुग्णांना उपचार देत असून, सुमारे ५७०० खाटांची सुविधा उपलब्ध असल्यामुळे त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा व मनुष्यबळ आहे. या पार्श्वभूमीवर, राज्य शासनाने या रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर करण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव पुढे आणला आहे. या उपक्रमामुळे मानसिक आरोग्य क्षेत्रात



दर्जेदार उपचार सेवांसोबतच शिक्षण आणि संशोधनालाही चालना मिळणार आहे.

**केंद्र शासनाच्या योजनेशी सुसंगत उपक्रम**

केंद्र शासनाच्या मॅनपॉवर डेव्हलपमेंट स्कीम अंतर्गत, स्ट्रेंथनिंग पीजी डिपार्टमेंट इन मेंटल हेल्थ स्पेशालिटिज (स्कीम बी) या योजनेनुसार मानसिक आरोग्य क्षेत्रात प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता दूर करण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहेत. राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत (एनएमएचपी) १२व्या पंचवार्षिक योजनेपासून या दिशेने विशेष भर देण्यात आला आहे. ज्या ठिकाणी आधीपासून पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत, अशा प्रादेशिक रुग्णालयांमध्ये मानसिक आरोग्याशी संबंधित पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे.

**शासन निर्णय आणि अभ्यासक्रमांची सुरुवात**

राज्य शासनाने १६ सप्टेंबर २०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करून खालील अभ्यासक्रमांना मान्यता दिली आहे: एम.डी. सायकिअॅट्री एम.फिल क्लिनिकल सायकॉलॉजी एम.फिल सायकियाट्रिक सोशल वर्क डिप्लोमा इन सायकियाट्रिक नर्सिंग हे अभ्यासक्रम प्रादेशिक मनोरुग्णालय ठाणे, पुणे (येरवडा) आणि नागपूर येथे सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**नागपूर येथे एम.डी. सायकिअॅट्रीला सुरुवात**

प्रादेशिक मनोरुग्णालय नागपूर येथे वैद्यकीय शिक्षण विभाग व सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या संयुक्त प्रयत्नांतून एम.डी. सायकिअॅट्री अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे.

इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथील अध्यापकांच्या सहकार्याने हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून सुरू झाला असून, दरवर्षी ४ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात आहे. आजपर्यंत १२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून, त्यापैकी २ विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केला आहे.

**नर्सिंग क्षेत्रातही प्रगती**

प्रादेशिक मनोरुग्णालय ठाणे व पुणे येथे डिप्लोमा इन सायकियाट्रिक नर्सिंग अभ्यासक्रम २०२२-२३ पासून सुरू करण्यात आला आहे.प्रत्येक ठिकाणी दरवर्षी २० विद्यार्थी प्रवेश घेत आहेत.आतापर्यंत ठाणे येथून ५९ आणि पुणे येथून ६० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या उपक्रमामुळे मानसिक आरोग्य क्षेत्रात प्रशिक्षित नर्सिंग कर्मचाऱ्यांची उपलब्धता वाढण्यास मदत होत आहे. या चारही प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालयांचे पूर्णतः अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर केल्यामुळे पुढील फायदे अपेक्षित आहेत. रुग्णांना अधिक दर्जेदार आणि विशेषज्ञ उपचार सेवा. मानसिक आरोग्य क्षेत्रात प्रशिक्षित डॉक्टर, मानसशास्त्रज्ञ व सामाजिक कार्यकर्त्यांची संख्या वाढ. संशोधन आणि नवोपक्रमाला चालना. ग्रामीण व वंचित भागांपर्यंत गुणवत्तापूर्ण मानसिक आरोग्य सेवा विस्तार होणार. महाराष्ट्रातील प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर हा केवळ आरोग्य क्षेत्रातील नव्हे तर शिक्षण आणि सामाजिक विकासाच्या दृष्टीनेही एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. केंद्र व राज्य शासनाच्या समन्वयातून राबविण्यात येणारा हा उपक्रम राज्यातील मानसिक आरोग्य सेवांना नवे बळ देणारा ठरेल.

# लोकरंग

१ साप्ताहिक संवाद

रुपयाची पडझड आणि बाजारामध्ये किंचित सुधारणा

आखाती देशातील मागील दोन महिन्यापासून अमेरिका आणि इराण सारख्या देशामध्ये भडकलेल्या युद्धाचे परिणाम संपूर्ण जगाला भोगावे लागत आहेत. जगभरातील अनेक देश इंधनाच्या बाबतीत आखाती देशांवर अवलंबून असल्यामुळे जगभरात इंधनाचा तुडवडा भासू लागला आहे. त्याचवेळी भारतीय रुपयाचे ऐतिहासिक अवमूल्यन होतेय आणि त्यातूनच शेअर बाजार सातत्याने कोसळतो आहे. सध्याची इंधन तुडवड्याची गंभीर समस्या,रुपयाचे अवमूल्यन आणि शेअर बाजाराची दोलायमान अवस्था याच अनुषंगाने अर्थतज्ज्ञ आणि शेअर बाजारचे अभ्यासक शशांक गुलगुले यांच्याशी आजचा सापथिक संवाद.

१ आखाती युद्धाचा परिणाम म्हणजेच इंधनाची झालेली भरमसाठ दरवाढ आहे का?

होय आखाती देशात मागील दोन महिन्यापासून सुरु असलेल्या इराण आणि अमेरिका या देशांमध्ये सुरु असलेल्या युद्धाचा सर्वात मोठा दुष्परिणाम म्हणजे इंधनामध्ये दरवाढ होत आहे. काही देशामध्ये अगदी आपल्या भारतात देखील पेट्रोल,डिझेल आणि सी एन जी सारख्या इंधनाचा तुटवडा भासू लागलेला आहे. मात्र जगातील इतर देशांच्या तुलनेत आपल्याकडील इंधनाची भाववाढ हि कमी आहे. इतर देशामध्ये क्रूड ऑइल ची वाढ हि २५ ते २८ टक्के इतकी भरमसाठ आहे मात्र त्या तुलनेत आपल्या देशात हि वाढ २० टक्क्यापर्यंतच केलेली आहे.

२भारतीय रुपयाने मागील काही दिवसात अगदी तळ गाठलेला आहे याचे कारण?

भारतीय रुपया गुरुवारी १३ पैशानी कमी होऊन नव्या नीचांकी अंकावर पोहचला. यामुळे एका अमेरिकी डॉलरची किंमत ९७ रुपयांपर्यंत जाऊन पोहचलेली आहे. पश्चिम आशियायी संकटामुळे जगातिक कच्चा खनिज तेलाचा दर भडकला आणि त्याचा थेट परिणाम रुपयाच्या वाटचालीवर झालेला दिसतो. एकेकाळी आशियातील अधिक स्थिर चलनापैकी एक मानला जाणारा रुपया आता यावर्षी सर्वात खराब कामगिरी करणाऱ्या उदयोन्मुख बाजारपेठेतील चलनापैकी एक बनला आहे.

३ सध्याची शेअर बाजाराची स्थिती नेमकी कशी आहे?



रिलायन्स इंडस्ट्रीजच्या समभागांची मोठ्या प्रमाणावर खरेदी झाल्याने मागील काही दिवसापासून सातत्याने कोसळणारा भारतीय शेअर बाजार काही अंशाने का होईन वधारला आहे. यामुळे सेन्सेक्स आणि निफ्टी मध्ये किंचित वाढ झालेली आहे. कच्च खनिज तेलाचा दर वाढल्यामुळे बाजार सावध झाला असून बीएसई आणि एन एस इ चे सेन्सेक्स काही प्रमाणात वधारले. सेन्सेक्स मध्ये ११७ टक्के तर निफ्टी ४१ अंशांनी वधारला. मात्र पुढील काळात शेअर बाजाराची अवस्था हि डोलायमंच असणार आहे.

२ चला पर्यटनाला

प्रेक्षणीय महाबळेश्वर

महाबळेश्वर हे महाराष्ट्रातील थंड हवेचे ठिकाण आहे. तसेच महाबळेश्वर हे सह्याद्रीच्या पर्वत रांगांवर समुद्र सपाटीपासून सुमारे ४५०० फुट उंचीवर वसलेले आहे.महाबळेश्वरला जुन्या मुंबई प्रांताची उन्हाळ्यातील राजधानी म्हणूनच संबोधले जात होते. येथील हिरवा निसर्ग, सुंदर बगीचे, उदयाने, श्वास रोखायला लावणारी दृश्ये इत्यादीमुळे पर्यटक मंत्रमुग्ध होतात. ब्रिटीश-कालीन वैभवसंपन्न आणि मनमोहक वाडे, इमारती या आजही त्यावेळच्या ब्रिटीश राजवटीची ओळख करून देतात. मार्च ते जून हा कालावधी महाबळेश्वरला भेट देण्यास योग्य आहे.येथील प्रेक्षणीय ठिकाणांना 'पॉईंट' म्हणतात. बहुतांशी 'पॉईंट' हे डोंगराच्या टोकालाच आहेत.

महाबळेश्वरातील सर्वात प्रसिद्ध पॉईंट म्हणून ओळखला जातो. या पॉईंटच्या डावीकडे खोल दरीतून कोंकणात जाणारीसावित्री नदी आहे तर उजवीकडे घनदाट जंगले आहेत यालाच ब्रम्हारण्य असेही म्हणतात हि सर्व मनमोहक आणि आकर्षक दृश्ये इतर गोष्टींचा विसर पडायला भाग पाडतात. हवामान जर स्वच्छ असेल तर या पॉईंटवरून रायगड किल्ला ,तोरणा किल्ला स्पष्ट दिसतात. याच मार्गावर 'टायगर स्प्रिंग', 'इको पॉईंट', 'एलफिस्टन पॉईंट' आहेत.


आर्थर पॉईंटच्या मार्गावरच मनमोहक ,आरोग्यदायक आणि नैसर्गिक दृष्टया समृद्ध असा ईको पॉईंट आहे.इथे खोल दऱ्या, उंच पर्वत पहावयास मिळतात.येथून खोल दरीमधल्या कोयना नदीचे दर्शन होते.तसेच या ठिकाणाहून मावळत्या सूर्याचे दर्शन त्याच्या सौंदर्यात आणखीनच भर टाकते.हा महाबळेश्वर मधील सर्वात प्रसिद्ध पॉईंटआहे.सर्व पर्यटक इथे मावळत्या सूर्याचे दर्शन घेण्याकरिता येत असतात.यालाच 'सनसेट' पॉईंट असेही संबोधतात.

३ अक्षररंग

वाचनीय आणि स्फोटक -: वाळूचे किल्ले

''वाळूचे किल्ले'' ही अविनाश कोल्हे यांची कादंबरी डिंपल पब्लिकेशनने देखण्या रूपात प्रकाशित केली आहे. ही कादंबरी अविनाश कोल्हे यांनी श्रीभाऊंच्या स्मृतीस अर्पण केली आहे. या निमित्ताने त्यांनी माणूस चे दिवस, या शीर्षकान्वये आपल्या सविस्तर आठवणी मांडल्या आहेत. सप्टेंबर,१९८० मध्ये अविनाश पुणे सोडून मुंबईकर झाले. तरीदेखील त्यांचे पुण्याला प्रा.स.शि.भावे सरांना भेटण्यासाठी जाणे-येणे सुरू होते. त्यांच्याशी बोलताना श्री. ग. माजगावकर यांच्यासंबंधी बोलणे होत असे. १९८५ मध्ये माणूसच्या रौप्य महोत्सवी वर्षी पुण्यात झालेल्या कार्यक्रमात श्रीभाऊ यांनी निवृत्त होण्याविषयी मनोगत मांडले होते. भावे सरांनी माणूस ची जबाबदारी घेण्याविषयी अविनाश यांना विचारले. त्यानंतर जानेवारी १९८७ पासून माणूस त्रैमासिक स्वरूपात प्रकाशित करण्याचे ठरले. दरवर्षी दिवाळी अंकासह चार विशेषांक, अविनाश यांनी १९९१ पर्यंत संपादित केले. त्यावेळचे विविध अनुभव अविनाश यांनी सविस्तरपणे नोंदविले आहेत. या कादंबरीचे देखणे, रंगीत मुखपृष्ठ सतीश भावसार यांचे आहे. ही कादंबरी लहानमोठ्या आठ प्रकरणांतून वाचकांसमोर उलगडते.

रागिणी ठाकरे-पाटीलने बॉम्बे लॉ कॉलेजमध्ये, बी. ए. पूर्ण केल्यावर, पहिल्या वर्षाला प्रवेश घेतलाआहे. अभ्यासू रागिणी न्या. गजेंद्रगडकर वक्तृत्व स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी, मार्गदर्शनासाठी ज्येष्ठ ग्रंथपाल संतोष म्हात्रे यांना भेटते. हुषार रागिणी काय वाचते आहे, याची ते सखोल चौकशी करतात. इंग्रजी ग्रंथांचे वाचन करण्यास मार्गदर्शन करतात. नंतर कॅन्टीनमध्ये म्हात्रे तिची ओळख काही विशेष, मार्गदर्शक प्राध्यापकांशी वेळोवेळी करून देतात. संतोष म्हात्रे यांनीही कायद्याची पदवी घेतली आहे. संतोष म्हात्रे रागिणीचे ज्येष्ठ मित्र आणि मार्गदर्शक होतात. त्यांच्या तिच्याकडून खूप काही अपेक्षा आहेत.या कादंबरीतून वाचकांसमोर येणाऱ्या घडामोडी प्रामुख्याने पाच वर्षांतील आहेत (२०१३पर्यंत). मुंबईतील इंग्रजी-मराठी संमिश्र भाषा, वाढत्या वयाच्या युवा पिढीच्या लैंगिक प्रेरणा, त्याविषयीचे त्यांचे अनेक गैरसमज आणि अज्ञान हे सारे सुजाण वाचकांना जाणव



**संकलन संयोजन**
**सुबोध रणशेवरे**
**संपर्क -९८३३१४६३५६**
**इमेल -**
subodh.ranshevre
@rediffmail.com

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
रविवार २४ मे २०२६


या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

## राज्यसभा पोटनिवडणुकीसाठी १८ जूनला मतदान

मुंबई, : राज्यसभा सदस्य सुनेत्रा अजित पवार यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या जागेसाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. सुनेत्रा पवार यांनी ६ मे २०२६ रोजी राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. या जागेचा कार्यकाळ ७ जुलै २०२८ पर्यंत आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार, १ जून २०२६ पासून निवडणूक प्रक्रिया सुरू होणार असून १८ जून २०२६ रोजी मतदान आणि त्याच दिवशी मतमोजणी होणार आहे.

निवडणूक कार्यक्रमानुसार ८ जूनपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. ९ जून रोजी अर्जांची छाननी होईल, तर ११ जून ही उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत असेल. १८ जून रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत मतदान प्रक्रिया पार पडेल. त्यानंतर सायंकाळी ५ वाजता मतमोजणी करण्यात येणार आहे.

निवडणूक आयोगाने २० जून २०२६ पर्यंत संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचे नियोजन केले असल्याची माहिती महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

## कर्जत शहर राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्षातर्फे

साखळी उपोषण कर्जत:जयेश जाधव ङ्गकर्जत शहर राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्षातर्फेङ्गसाखळी उपोषण दि.२५/०५/२०२६ रोजीटिळक चौक कर्जत कपालेश्वर मंदिरा समोर आयोजित करण्यात आला आहेङ्गया साखळी उपोषण चारफाटा येथील ट्राफिक च्या समस्येमुळे त्रस्त झालेले सामान्य नागरिक दररोज कर्जत- पनवेल प्रवास करणारे नागरिक वाहनाने मुंबई ला जाणारे प्रवासी सर्वच्या सोयी साठी कर्जत पनवेल जुना १५ मीटर (५० फूट) चा डिपी रोड मध्ये सॅगंशन झालेले आहे तो रस्ता पूर्ण न करता झालेला रोड हा अर्धवट राहिलेला आहे तो नगरपरिषेदेने लवकरात लवकर पूर्ण करून सामान्य नागरिकाना ट्राफिक च्या समस्येपासून दिलासा द्यावा हि विनंती अनेक वेळा पत्रव्यवहार करून दि.३१/०१/२०२६ पासून मुख्यमंत्री कार्यालयापासून ते सर्व शासकीय यंत्रणा ते दि.१२/०५/२०२६ पर्यंत पत्र व्यवहार करून देखील नगरपरिषद कार्यालयांनी आम्ही पुन्हा ठराव घेतो अशी उत्तर दिले.




अनेकदा पाठपुरावा करून देखील रस्त्याचे काम पूर्ण होत नाही त्यामुळे लोकशाही पध्दतीने सनदशील मार्गाने साखळी उपोषण करण्याचे ॲड. भाऊसाहेब पंजु मोरे कर्जत शहर अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्षाने ठरविले आहे. सर्व राजकीय पक्षांनी समाजसेवी संघटनांनी कर्जतच्या प्रत्येक नागरिकांनी आम्हाला पाठिंबा द्यावा असे आवाहन केले असून कर्जत शहरातील व चारफाटा ट्राफिक च्या समस्येला त्रस्त असलेल्या जनतेनी या उपोषणात सहभागी होण्यासाठी आवाहन केले आहे

## महाराष्ट्र हा केवळ भूप्रदेश नाही तर भारतीयांच्या स्वाभिमानाचा विषय : छत्रपती वृषाली राजे भोसले

पुणे : महाराष्ट्र हा केवळ एक भूप्रदेश नाही तर छत्रपती शिवाजी महाराजांचे कर्तृत्व, छत्रपती संभाजी महाराजांचे बलिदान आणि स्वराज्य स्थापनेत योगदान दिलेल्या अनेक मावळ्यांच्या त्यागाचे प्रतीक म्हणून तो भारताच्या स्वाभिमानाचा विषय आहे. मराठा साम्राज्य ही देशाच्या इतिहासातील प्रेरणादायी बाब आहे. त्यामुळे मराठा साम्राज्याचा नकाशा एनसीईआरटीच्या पुस्तकांमध्ये पुन्हा समाविष्ट झालाच पाहिजे, अशी आग्रही मागणी सातारा गादीच्या प्रतिनिधी छत्रपती वृषाली राजे भोसले यांनी केली.




एनसीईआरटीने हिंदी आणि इंग्रजी माध्यमांच्या पुस्तकातून मराठा साम्राज्याचा नकाशा काढून टाकला आहे. याबाबत राज्यभरात तीव्र प्रतिक्रिया उमटली. खुद्द राज्य सरकारने पत्र देऊन देखील एनसीईआरटीने अद्याप त्याची दखल घेतलेली नाही. या बाबीच्या निषेधार्थ छत्रपती वृषाली राजे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली या महाराष्ट्र धर्म मोर्चाचे आयोजन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ यांच्या वास्तव्याने पावन झालेल्या लाल महालापासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत हा मोर्चा काढण्यात आला.

एनसीईआरटीकडून पाठ्यपुस्तकातील मराठा साम्राज्याचा नकाशा हटवून दैदीप्यमान इतिहासाला लपवण्याचा आणि खोटा इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत घेऊन जाण्याचा प्रयत्न केला जात आहे. छत्रपती घराण्यासह संपूर्ण महाराष्ट्राकडून आपण त्याचा निषेध करीत आहोत, असे छत्रपती वृषाली राजे यांनी यावेळी नमूद केले.

तसेच महाराष्ट्र सरकारने याबाबतीत केंद्राकडे पाठपुरावा करावा, असे आवाहन करतानाच त्यांनी मराठा साम्राज्याच्या नकाशाची पाठ्यपुस्तकात पुनर्स्थापना होईपर्यंत हा संघर्ष सुरूच राहील, असा इशाराही दिला. या मोर्चात इतिहास संशोधक, अभ्यासक यांच्यासह विविध संघटना, संस्थाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कोल्हापूर खंडपीठाचे न्यायमूर्ती रणजीतसिंह भोसले यांचा अन्नछत्र मंडळात सत्कार

अक्कलकोट : श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे



विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून उत्कृष्ट व्यवस्थापन होत असल्याचे मनोगत उच्च न्यायालय मुंबई, कोल्हापूर खंडपीठाचे न्यायमूर्ती रणजीतसिंह भोसले यांनी व्यक्त केले.

ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे सहपरिवार आले असता न्यासाचे सचिव शामराव मोरे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी ते बोलत होते. त्यांच्या समवेत अक्कलकोटचे दिवाणी न्यायाधीश मुकुल कल्याणकर, अक्कलकोट न्यायालयाचे स्वप्नील मोरे, अविनाश सुरवसे, सोमशेखर बाहेरमठ हे उपस्थित होते. याप्रसंगी मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, सौरभ मोरे, वैभव मोरे, दत्ता मोरे, दत्ता माने, प्रवीण देशमुख, प्रवीण घाटगे, विजय माने, शुभम सावंत, बाळासाहेब पोळ, यश विभूते, शहाजी यादव, सतीश महिंद्रकर, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, राजू पवार, रमेश हेगडे, तानाजी पाटील, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, मल्लिकार्जुन गवळी, रोहित कदम, विशाल घाटगे, धनंजय निंबाळकर, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी, राहुल इंडे यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

## मतदार यादीत घोळ करणाऱ्यांना आगामी काळात जेलमध्ये जावे लागेल : हर्षवर्धन सपकाळ

मुंबई –भाजपाने निवडणूक आयोगाच्या मदतीने वोटचोरी करून महाराष्ट्रात सत्ता मिळवली. बिहार आणि बंगालमध्येही मतदारांची नावे वगळून भाजपने विजय मिळवला. मतदार यादी पुनरिक्षणाच्या माध्यमातून निवडणूक प्रक्रियेवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न सुरु आहे. लोकशाहीची हत्या करणाऱ्या आणि मतदार यादीत घोळ करणाऱ्यांना आगामी काळात जेलमध्ये जावे लागेल असा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिला आहे.

निवडणूक आयोगामार्फत राज्यात राबविण्यात येत असलेल्या मतदार यादी पुनरिक्षण () मोहिमेच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीची अत्यंत महत्त्वपूर्ण राज्यस्तरीय बैठक आज टिळक भवन, दादर येथे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. बैठकीला माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार, काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य बाळासाहेब थोरात व नसीम खान, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस गुरुदीप सप्पल, विधान परिषदेतील काँग्रेस पक्षाचे गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील, माजी मंत्री डॉ. नितीन राऊत, ॲड. यशोमती ठाकूर, आ. अमित देशमुख, आ. डॉ. विश्वजीत कदम, काँग्रेस वर्किंग कमिटीच्या सदस्या खा. प्रणिती शिंदे, माजी मंत्री रणजित कांबळे, राजेंद्र मुळक, खासदार शोभा बच्छाव, खासदार बळवंत वानखेडे, खासदार प्रतिभा धानोरकर, खासदार रविंद्र चव्हाण, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव कुणाल चौधरी, प्रदेश काँग्रेसचे संघटन सरचिटणीस ॲड. गणेश पाटील, प्रदेश सरचिटणीस अभिजीत सपकाळ यांच्यासह प्रमुख नेते खासदार, आमदार व १ उपस्थित होते. मतदार यादीतील कथित गैरप्रकार, वोटचोरी आणि संदर्भात या बैठकीत सविस्तर चर्चा झाली.

बैठकीच्या सुरुवातीला केरळ विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाने मिळवलेल्या विजयाबद्दल अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या अभिनंदनाचा तसेच केरळचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी गृहमंत्रीपदाची शपथ घेतल्याबद्दल व सर्व नवनियुक्त जिल्हाध्यक्षांचे अभिनंदन करणारा ठराव मांडण्यात आला एकमताने हा ठराव मंजूर करण्यात आला. त्यानंतर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने मोहिमेबाबत सुरु केलेल्या मोहिमेच्या लोगोचे सर्व प्रमुख्य नेत्यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. बैठकीदरम्यान अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस गुरुदीप सप्पल, सतेज ऊर्फ बंटी पाटील, आशुतोष शिर्के, निमिष साने यांनीही मोहिमेच्या अनुषंगाने सादरीकरण आणि मार्गदर्शन केले. बूथस्तरावरील संघटन मजबूत करण्याबरोबरच प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचण्याचे आवाहन करण्यात आले. आगामी काळात राज्यभर जनजागृती मोहीम राबवून मतदारांचे अधिकार अबाधित राखण्यासाठी काँग्रेस पक्ष आक्रमकपणे मैदानात उतरणार असल्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

बैठकीनंतर पत्रकार परिषदेत बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की,

सपकाळ यांनी सांगितले की, मोहिमेअंतर्गत –१ संदर्भातील विशेष कार्यशाळा यशस्वीरित्या पार पडली असून संपूर्ण राज्यात बूथस्तरावर सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. राष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञांची टीम तसेच राज्यातील अनुभवी पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांना निवडणूक प्रक्रिया, मतदार यादी पडताळणी, हरकती व दुरुस्त्या यासंदर्भात सविस्तर प्रशिक्षण दिले. प्रत्येक मतदाराचे संरक्षण करण्यासाठी काँग्रेस पक्ष सज्ज असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने मोहिमेसाठी विशेष समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला असून विधान परिषदेतील काँग्रेस पक्षाचे गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील यांची या समितीच्या प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली असून अभिजीत सपकाळ हे समन्वयक म्हणून काम पाहणार आहेत. राज्यभरातील जिल्हा व तालुका स्तरावरील यंत्रणेशी समन्वय साधून मतदार यादी पडताळणी मोहिमेला गती देण्याचे काम समितीमार्फत करण्यात येणार आहे.

आगामी विधान परिषद निवडणुकांबाबत बोलताना ते म्हणाले की, ''राज्यात अनेक ठिकाणी कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. मित्रपक्षांशी सकारात्मक चर्चा सुरू असून लवकरच निर्णय जाहीर केला जाईल.

भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती), संपर्क : ९०४९८११०६५ मु. भिंगळोली पो.ता.मंडणगड जि.रत्नागिरी, कोकण विभागीय कार्यालय पत्ता : निलेश महादेव आखाडे ०६ र.न.प.वसाहत नाचणे रोड रत्नागिरी.४१५६१२

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफिसजवळ, माळीवेस बीड– ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )